Estd. 1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY (KNOWLEDGE RESOURCE CENTER)
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय (ज्ञान स्त्रोत केंद्र)
Phone (Direct) : +91-0231- 2609204, Office : 2609205, Deputy Librarian : 2609210,
Asst. Librarian : 2609421, Circulation : 2609210,
Reference : 2609209, Stack : 2609212, Periodicals : 2609208, Archival : 2609336
Fax : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333; Website : URL : http://www.unishivaji.ac.in/library
E-mail : subbkl@unishivaji.ac.in; nbk.ul@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/BBKL (KRC)/
Ref.No. : SU/BBKL(KRC)/183

Date :
Date : 26/02/2021

# परिपत्रक

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामार्फत "शिवज्ञानसागर : इन्स्टिट्यूशल रिपॉझिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी" (शिवज्ञानसागर (IR)) ची निर्मिती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व त्याअंतर्गत येणा-या अधिविभाग, विभागाकडील विविध प्रकाशने/वाचनसाहित्य ऑनलाइन स्वरूपात वाचकांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. "शिवज्ञानसागर" च्या माध्यमातून सदर प्रकाशने / वाचनसाहित्य डिजिटल स्वरूपात कायमस्वरूपी जतन करता येतील, तसेच प्रकाशनांच्या वापरामध्ये वाढ होऊ शकते. शिवज्ञानसागर ही इन्स्टिट्यूशल रिपॉझिटरी http://ir.unishivaji.ac.in:8080/jspui/ या संकेत स्थळावर कार्यान्वित झालेली आहे. शिवज्ञानसागर (IR) इंटरनेटच्या माध्यमातून सर्वांना वापरण्याकरीता उपलब्ध आहे. शिवज्ञानसागर(IR) मध्ये प्रकाशनांची नोंद व उपल्बधता करणे, PDF, Images etc.अपलोड करणे, नोंदी अद्ययावत करणे इत्यादी कामे इंटरनेटच्या माध्यमातून करता येतात. शिवज्ञानसागर(IR) च्या माध्यमातून विविध विभागकडील प्रकाशने(उदा. संशोधन अहवाल, संशोधन लेख, विभागांच्या चर्चासत्रे व परिषदांची कार्यवृत्ते इ.)/वाचनसाहित्य वाचकांसाठी उपलब्ध करून देता येतील. यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

१. सबंधीत विभागाकडून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राकडे आपल्या विभागासाठी Community and Collection साठी लेखी मागणी करावी. (नमुना अर्ज सोबत जोडला आहे.) Community म्हणजे सदर विभागाचे नाव असेल आणि वाचनसाहित्य/प्रकाशनाच्या प्रकाराप्रमाणे collection चे नाव असेल.

२. सदर कम्युनिटी व कलेक्शन मध्ये प्रकाशने / वाचनसाहित्य समाविष्ट करण्यासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राकडे User ID व Password तयार करून मिळणे साठी

लेखी मागणी करावी. त्याप्रमाणे User ID व Password तयार करून दिले जातील. सदर User ID व Password चा गैरवापर होणार नाही याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

३. सदर User ID ने विभागाशी संबंधित Collection मध्ये प्रकाशने / वाचनसाहित्य समाविष्ट/ अपलोड करण्याविषयीचे मार्गदर्शन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राकडून मागणी केलेनंतर केले जाईल.

४. सदर कलेक्शन मध्ये समाविष्ट करण्यात येणा-या प्रकाशने / वाचनसाहित्यांची निवड करण्याची व प्रकाशने / वाचनसाहित्य शिवज्ञानसागर (IR) मध्ये समाविष्ट करण्याची पूर्ण जबाबदारी ही ज्या त्या विभागाची असेल.

५. प्रकाशनांची / वाचनसाहित्याची निवड करताना प्रकाशनाचा Copyright, IPR व इतर कायदेशीर बाबींचा विचार करूनच सदर प्रकाशनांची निवड करावी. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विभागाची असेल.

६. निवड केलेली प्रकाशने / वाचनसाहित्य शिवज्ञानसागर(IR) मध्ये उपलब्ध करण्याविषयीच्या योग्य त्या प्रशासकीय मान्यता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील. सदरच्या मान्यता घेतल्यानंतरच प्रकाशने / वाचनसाहित्य शिवज्ञानसागर(IR) मध्ये समाविष्ट करावे.

७. शिवज्ञानसागर(IR) मध्ये उपलब्ध करून दिलेल्या प्रकाशन / वाचनसाहित्य इ. बाबत कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित विभागाची राहील याची नोंद घ्यावी.

८. आवश्यकतेनुसार अधिविभागांना देखील उपरोक्त नमूद (१ते ७) प्रमाणे शिवज्ञानसागर(IR) मध्ये सहभागी होता येईल.

Bhat 26/12/21

संचालक,
बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विभागाचे नांव-

दि. –

प्रति,

मा. संचालक.

बॅ.बा.ख.ज्ञान स्त्रोत केंद्र,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय- शिवज्ञानसागर (IR) बाबत.

महोदय/महोदया,

शिवज्ञानसागर (IR) मध्ये आमच्या विभागासाठी खाली नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे Community, Collection तसेच सदर Collection मध्ये प्रकाशने अपलोड करणे/ अद्यावत करणेसाठी User ID व Password तयार करून मिळावा.

| | |
|---|---|
| विभागाचे नांव- Sub-Community तयार करणेसाठी | : |
| विभागप्रमुखाचे नांव- | : |
| e-mail address (for Shiv Dnyansagar (IR) user id) | : |
| Name of the Collection- (Type of Publication): | |
| 1) | 2) |
| 3) | 4) |
| 5) | 6) |

बॅ.बा.ख.ज्ञान स्त्रोत केंद्राचे दि. २६/०२/२०२१ रोजीचे परिपत्रक संदर्भ क्रमांक :SU/BBKL(KRC)/183 वाचले आहे व मान्य आहे. उपरोक्त नमूद माहिती प्रमाणे आमच्या विभागासाठी Community, Collection, User ID व Password तयार करून मिळावेत.

हि विनंती

विभागप्रमुख